N.S.S. Programme Co-ordinator

University of Mumbai

Tele / Fax No. : 022-22873696
website : www.nssmu.org
National Service Scheme Cell,
Vidyapeeth Vidyarthi Bhavan,
2nd Floor, B-Road, Churchgate,
Mumbai - 400 020.

No.NSS/ ६०० /२०१६-२०१७

Date : २४/०२/२०१७

प्रति,
प्राचार्य, राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सर्व महाविद्यालये,

विषय : २७ फेब्रुवारी, २०१७ रोजी मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यासाठीचे कार्यालयीन आदेश.

संदर्भ : १) शासन परिपत्रक क्रमांक—बैठक—२४१३(प्रक्र.०४/१७/समन्वय, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२, तारीख २० जानेवारी, २०१७.

२) सहसंचालक कार्यालयाचे पत्र क्रमांक — क्र.ससं/उशि/मुंवि/मराठी भाषा गौरव दिन/२०१७/३१९.

३) कुलसचिव, मुंबई विद्यापीठ यांचे पत्र क्रमांक PRO/ICD/16-17/135, दिनांक १० फेब्रुवारी, २०१७.

मा. महोदय/महोदया,

वरील संदर्भाधीन शासन परिपत्रक, सहसंचालक कार्यालयाचे मुंबई आणि कुलसचिव मुंबई विद्यापीठ यांचे प्राप्त झालेले पत्र, मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी राज्यातील सर्व विभागीय सहसंचालकांची, कुलसचिव आणि वित व लेखा अधिकारी सर्व विद्यापीठे यांच्या बैठकीत ठरलेलया बाबींच्या अनुषंगाने आपणास विदितच आहे की, श्री. वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दिनांक २७ फेब्रुवारी, हा जन्मदिन **'मराठी भाषा गौरव दिन'** म्हणून साजरा करण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी खालील प्रकारे उपक्रम राबविण्यात यावेत.

१) प्रत्येक महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांच्या मदतीने मराठी विकिपीडियावर मराठीतून लिखान करण्यास विद्यार्थ्यांस प्रोत्साहन देणे.

२) अधिकाअधिक पृष्ठे मराठी विकिपीडियावर तयार केली जाणार यासाठी संलग्नित महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांपर्यंत ही संकल्पना पोहचविणे. महाविद्यालयांत सुचना फलकांवर त्यासंबंधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सुचना देण्यात याव्यात.

३) शासन परिपत्रक व संबंधित उपक्रम सूची प्रमाणे महाविद्यालयापर्यंत विविध उपक्रम राबविणे.

४) सर्व प्रकारच्या महाविद्यालयांमध्ये, सर्व विभागांच्या सहभागातून कार्यक्रम होतील, याबाबत प्राचार्यांनी स्वत: प्रयत्नशिल राहुन सर्व विभागांना तशा सुचना दयाव्यात.

कृ.मा.प.....

५) राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक यांनी जिल्हानिहाय एका मोठ्या महाविद्यालयात अशा कार्यक्रमाचे आयोजन करून तो कार्यक्रम संपूर्ण जिल्ह्याचा कार्यक्रम असेल अशा पद्धतीने कार्यक्रम साजरा करण्यात यावा.

६) प्रत्येक जिल्हानिहाय आणि महाविद्यालयात कशा व कोणत्या पद्धतीने कार्यक्रम साजरा करण्यात आला त्याअनुषंगाने कार्यक्रमाचा अहवाल कुलसचिव कार्यालयास सादर करावयाचा असल्याने सदरचा अहवाल त्वरीत विद्यापीठास सादर करावा.

मराठी भाषा गौरव दिवस अंतर्गत आयोजीत कार्यक्रमात आपल्या महाविद्यालयाने सहभागी व्हावे. हि विनंती.

आपला विश्वासु

प्रा. बाबासाहेब स. बिडवे
कार्यक्रम समन्वयक, रासेयो विभाग

प्रतिः १) राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक यांनी मराठी भाषा दिन कार्यक्रम जिल्हा स्तरावर आयोजीत करून त्यासंदर्भात अहवाल विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्षास सादर करावा.

२) मा. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ यांना योग्य त्या माहितीसाठी.

सोबत : १) शासन परिपत्रक क्रमांक—बैठक—२४१३(प्रक्र.०४/१७/समन्वय, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२, तारीख २० जानेवारी, २०१७.

२) सहसंचालक कार्यालयाचे पत्र क्रमांक —क्रसस/उशि/मुंवि/मराठी भाषा गौरव दिन/२०१७/३१९.

३) कुलसचिव, मुंबई विद्यापीठ यांचे पत्र क्रमांक PRO/ICD/16-17/135, दिनांक १० फेब्रुवारी, २०१७.